ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयामध्ये पीएच. डी. पदवीसाठी

संशोधन आराखडा

संशोधक

बिराजदार बालाजी संजीवन

मार्गदर्शक

डॉ. एस. आर. शेटकार

प्राध्यापक

संजीवनी महाविद्यालय, चापोली

संशोधन केंद्र

महात्मा बस्वेश्वर महाविद्यालय,

लातूर

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

२०२२

- **प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारतामध्ये आजही जास्तीत जास्त लोकसंख्या आपली उपजिविकचे साधन म्हणून शेती व्यवसाय करतात. शेतकरी दिवसरात्र मेहनत करतो आणि अन्नधान्याचे उत्पादन घेत असतो. देशाच्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागवतो पण आज तोच शेतकरी स्वत:चे जीवनमान सुधारू शकला नाही. कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे. देशातील वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची व रोजगाराची गरज भागवण्याबरोबरच उद्योगधंद्याची वाढ व विकासामध्ये शेतीची मोलाची भूमिका आहे. जगातील प्रत्येक देशाच्या प्रारंभीच्या विकास अवस्थेत शेती क्षेत्राचे योगदान महत्वाचे आहे.

मानवाचे सामाजिकीकरण , मानवी संस्कृतीचा विकास, मानवी समाजाची जडणघडण याचा मुख्य गाभा म्हणजे कृषी संस्कृती होय. प्राचीन काळापासूनच मानवाच्या विकासात शेतीचे अनन्यसाधारण महत्व आहे. शाश्वत विकासात शेतीचे मोठे योगदान आहे. मानव आपली उपजिविका भागवण्यासाठी प्रामुख्याने शेती व्यवसायावर अवलंबुन होता. शेतीची सुरवात अतीप्राचीन काळापासून झालेली आहे. याचे अनेक पुरावे संशोधकांना मिळाले आहेत. जगात शेतीचा शोध सुमारे १०,००० वर्षांपूर्वी प्रथम मध्यपूर्वेतील आताचे ईस्त्राईल, पॅलेस्टाईन, जॉर्डन, लेबनॉन, सिरिया, तुर्कस्थान, कुतेत व इराक या प्रदेशातील सुपिक भागात लागला. शेतीसाठीच मानव विविध ठिकणी वसाहत करून राहू लागला. आणि या वसाहती मानवांच्या सामाजिकीकरणातील बदलाचा एक महत्वपूर्ण टप्पा समजला जातो.

सन २०२०—२१ मध्ये राज्याच्या स्थूल उत्पन्नामध्ये कृषी व संलग्न कार्ये या क्षेत्राचा विकास दर ११.७ टक्के एवढा ठेवला आहे तर बाकीच्या सर्व क्षेत्राचा वृध्दीदर हा नकारात्मक आहे. अर्थव्यवस्थेत शेतकऱ्याचे योगदान जास्त आहे पण त्या प्रमाणात शेतकऱ्याची स्थिती ही भयावह असल्याची दिसून येते. भारतातील शेतकरी फक्त शेती व्यवसाय करून महिन्याला ३००० हजार रूपये कमावतो. तर काही जोडधंदा करीत असेल तर त्या शेतकऱ्याला ६५०० रूपये

मिळतात. भारतामधील ९ कोटी शेतकऱ्यांपैकी ५२ टक्के शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकलेली आहेत. (१८ सप्टेंबर २०१९ सुचिता देशपांडे यांचा ओआरएफ मधील लेख) या सर्व परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट होत चालली याचा परिणाम सामाजिक स्थिती बिघडून शेतकरी स्वतःचे आयुष्य संपवण्याच्या वळणावर येऊन पोहचला आहे. एनआरसीबी च्या माहितीनुसार सन २०१७—२०१९ या कालावधीत भारतामधील १७६७५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यात महाराष्ट्रातील ७३४५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद मिळते. या सर्व समस्याचे कारण म्हणजे शेतकऱ्याजवळ असलेल्या शेतीची धारण क्षमता कमी झाली आहे. यामुळे शेतकरी आपल्या शेतामध्ये उत्पन्नवाढीसाठी आधुनिक तंत्रे साधने याचा वापर करता येत नाही.

- **अल्पभूधारक व्याख्या :**

‘‘ अल्पभूधारक म्हणजे आपल्या धारण क्षेत्रात नवीन उत्पादन तंत्र, बी—बियाणे, किटकनाशके व जलसिंचन यासारख्या बाबींचा योग्य वापर न करता येण्याजोगे लहान क्षेत्र होय. ’’

‘‘ दोन हेक्टरपेक्षा किंवा त्यापेक्षा कमी जमीन असलेला शेतकरी म्हणजे अल्पभूधारक होय.’’

- **समस्यासूत्रण :**

शेतकऱ्यासाठी कमी क्षेत्र असणे ही एक समस्या आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे जमीनीच्या तुकडीकरणामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्याचा परिणाम शेतकऱ्याची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती खराब होत चालली आहे. लातूर जिल्हयामध्ये अगोदरच पावसाचे प्रमाण कमी आहे. त्यातच सिंचनाच्या अपुऱ्या सोयी यामुळे अल्पभूधारकाच्या समस्येत वाढ होत आहे.

- **संशोधनाचे महत्व :**

देशातील राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा वाटा दिवसेंदिवस कमी कमी होत चालला आहे. पण देशातील वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज पूर्ण

करण्याची क्षमता शेती क्षेत्रात आहे. पण वाढती लोकसंख्या व जमीनीची धारण क्षेत्र क्षमता दिवसेंदिवस कमी कमी होत चालली आहे. त्यामुळे शेती मधून मिळणारे उत्पन्न देखील कमी झाले आहे. देशात अल्पभूधारक शेतकऱ्याचे प्रमाण वाढत आहे. कमी क्षेत्र असल्यामुळे शेतकऱ्याला शेतीमध्ये होणारे उत्पन्न व खर्च याचा मेळ न बसल्यामुळे शेतकऱ्याची सामाजिक, आर्थिक परिस्थिती हालाखिची बनत चालली आहे. कमी उत्पन्न, खर्च अधिक, कजबाजारीपणा, निसर्गाचा लहरीपणा, सिंचनाच्या अपुऱ्या सोयी, सरकारचा शेतकऱ्याबद्दल असलेला उदासिन दृष्टिकोन इत्यादीमुळे शेतकऱ्याची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक स्थिती इत्यादी एक चिंतेचा विषय झालेला आहे.

अल्प जमीनीमुळे शेतकऱ्याला शेतामध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर, बी—बीयाणे, जलसिंचनाच्या आधुनिक पध्दतीचा अवलंब करता येत नाही. त्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्याची स्थिती इतर शेतकऱ्यापेक्षा निम्न प्रतीची असल्याचे दिसून येते. अल्पभूधाकाचे जीवनमान उंचावण्यासाठी सरकारकडून कोणत प्रयत्न केले जात आहेत का? या सर्व बाबीचे अध्ययन करण्यासाठी अल्पभूधारक शेतकऱ्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टे :**

१. लातूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्याच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

अ) अल्पभूधारक शेतकऱ्याचा सामाजिक कार्यामध्ये असलेला सहभाग.

ब) अल्पभूधारक शेतकऱ्यांचे राहणीमानातील झालेले बदल.

२. लातूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

अ) शेतीतून येणारे उत्पन्न व खर्चाचा अभ्यास.

ब) शेतीपूरक व्यायसायातून मिळणारे उत्पन्न.

३. लातूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्याच्या राजकारणातील सहभागाच्या स्थितीचा अभ्यास करणे.

अ) अल्पभूधारक शेतकऱ्याचा राजकीय क्षेत्रातील सहभाग.

ब) अल्पभूधारक शेतकऱ्यांची राजकीय क्षेत्रातील उदासिनता.

४. लातूर जिल्हयातील अल्पभूधारकता निर्माण होण्याचे कारण अभ्यासणे.

- **संशोधनाची गृहीतके :**

१. लातूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्याच्या सामाजिक जीवनमानतील स्थितीत सुधारणा होताना दिसून येत नाही.

२. लातूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होताना दिसून येत नाही.

३. लातूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्याच्या राजकीय सहभाग कमी आहे.

४. लातूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्याच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

- **संशोधन पध्दती :**

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी सामाजिक शास्त्रातील प्रचलित संशोधन पध्दतीतील सर्वेक्षणात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

- **तथ्य संकलनाच्या पध्दती :**

तथ्य संकलनासाठी दोन पध्दतीचा वापर केलेला आहे.

१. प्राथमिक पध्दत :

प्रस्तुत विषयाच्या संशोधन कार्याची अचूक माहिती प्राप्त करण्यासाठी प्राथमिक पध्दतीचा वापर करण्यात येईल. या प्राथमिक पध्दतीमध्ये माहिती संकलन करण्यासाठी मुलाखत प्रश्नावली या प्रमुख साधनाचा वापर करण्यात येईल.

२. दुय्यम पध्दत :

प्रस्तुत विषयाच्या संशोधन कार्यासाठी प्राथमिक साधनाबरोबरच दुय्यम साधनांचा वापर करून माहिती संकलन केले जाईल. यामध्ये प्रकाशित कागदपत्रे दैनिके, वर्तमानपत्रे, मासिके, शासकीय अहवाल, खाजगी अहवाल, विविध

पुस्तके तसेच इंटरनेटवरील उपलब्ध माहिती इत्यादी साधनांचा आधार घेण्यात येईल.

- **नमूना निवड :**

या संशोधन कार्यासाठी लातूर जिल्हयातील १० तालूक्यातील ९५० खेडयांपैकी १० टक्के अल्पभूरक शेतकरी संख्या असलेल्या गावातील अल्पभूधारक शेतकरी या प्रमाणे ३०० शेतकरी नमूना निवड करण्यात येईल.

- **प्रकरणांची रचना :**

प्रस्तुत संशोधनात खालीलप्रमाणे प्रकरणांची रचना करण्यात आली आहे.

१. प्रस्तावना
२. संशोधन अध्ययन पध्दती
३. कौटुंबिक माहिती
४. वैवाहिक स्थिती
५. आर्थिक स्थिती
६. राजकीय / सामाजिक स्थिती
७. संशोधन अहवाल

- **संशोधनाची व्याप्ती व मार्यादा :**

१. या संशोधन कार्यायाठी लातूर जिल्हा हे मर्यादीत कार्यक्षेत्र निवडण्यात आलेले आहे.
२. लातूर जिल्हयातील शहरे वगळून फक्त ग्रामीण भागातील गावांची निवड अभ्यासासाठी करण्यात आलेली आहे.
३. अल्पभूधारक शेतकऱ्यामध्ये ५ एकर व ज्यापेक्षा कमी शेतजमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.
४. या संशोधन कार्यासाठी सन २०१५ ते २०२० असा एकूण ५ वर्षाचा कालावधी निवडण्यात आलेला आहे.
५. संशोधनासाठी लातूर जिल्हयातील १० तालूक्यातील ९५० खेडयांपैकी १० टक्के अल्पभूधारक क्षेत्र असणाऱ्या गावातील एकूण ३००

अल्पभूधारक शेतकऱ्याची माहिती मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून भरून घेण्यात आलेली आहे.

- **संदर्भ सूची :**

१. कृषी अर्थशास्त्र —दूरशिक्षण — एम.ए. भाग १— शिवाजी विद्यापीठ.

२. आर.एम. मोरे / डॉ. एस.पी. घायाळ : आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास. विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड,२०१५.

३. एन.जी. चिघळीकर / डॉ. एल.एच. पाटील : कोल्हापूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्याची सामाजिक आर्थिक स्थिती : एक चिकीत्सक अभ्यास. स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड,२०१९.

४. आर.के.गित्ते / डॉ.आर.के.इप्पर : महाराष्ट्र राज्यातील अल्पभूधारक शेतकऱ्याच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे मूल्यमापन. (२००६ ते २०१५), डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. २०१७.

५. पी.डी. सुर्यवंशी / डॉ. यु.डी. सावंत : मराठवाडयातील अल्पभूधारक शेतकऱ्याचा राजकीय सत्तेतील सहभाग. स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड. २०११.

मार्गदर्शक	**संशोधक**
डॉ. एस. आर. शेटकार	बिराजदार बालाजी संजीवन